Please consider the environment before printing…

दिनांक:- 20 / 01 / 2025

# Kashibai Kanitkar Birth Anniversary 2025
# 20 जानेवारी 2025 काशीबाई कानिटकर जयंती.

S.N.D. POLYTECHNIC,BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK



20 January 1861 To 30 January 1948

## प्रस्तावना:

कानिटकर, काशीबाई : (२० जानेवारी १८६१-३० जानेवारी १९४८). आधुनिक मराठी साहित्यातील आद्यलेखिका.आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी ,चरित्र आणि कथा या साहित्याप्रकाचे महिला म्हणून प्रथमता लेखन केले आहे. काशीबाई या पंढरपूरचे कृष्णराव बापट यांच्या कन्या. २० जानेवारी १८६१ रोजी सातारा जवळील अष्टे या गावी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या दोन भावांना शिकवायला पंतोजी येत, ते ऐकून, बघून त्या माहेरीच लिहायला शिकल्या. त्याकाळात स्त्रीशिक्षणाला विरोध होत असे. पण वडिलांच्या प्रोत्साहनामुळे या अशा पद्धतीने शिकल्या. पुढे स्वप्रयत्नाने मराठी, इंग्रजी, संस्कृत नाटके वाचून त्यांनी आपली आवड जोपासली. तत्पूर्वी वयाच्या ९ व्या वर्षी काशीबाईंचे लग्न वकील गोविंदराव कानिटकरांशी झाले. ते सुधारणावादी होते. हरिभाऊ आपटे, न्या. रानडे यांच्या सहवासामुळे स्त्रियांनी शिकावे अशा विचारांचे ते होते. पण उघडपणे त्याकाळात काशीबाईंचे शिक्षण सुरू ठेवण्याची सोय नव्हती. पण तरीही काशीबाई टीका सहन करीत चोरून मारून शिकत, वाचत राहिल्या. गोविंदरावांसोबत त्या रविवारी दुपारी प्रार्थनासमाजातील सभांना जात असत, चर्चेत भाग घेत असत. घरी समजले की खूप गहजब होत असे. मग त्यांच्यावर घरातील

अवघड व श्रमाची कामे लादण्यात येत असत. पण ते काहीही असल तरी त्यांना या प्रार्थना समाजातील व्याख्याने ऐकून शास्त्रीय विषयांची गोडी लागली. त्यांनी मराठीतील प्राथमिक शास्त्रीय पुस्तके वाचली. तसेच मंडलिकांचा इतिहास, अर्थशास्त्र, कादंबरीसह भारतसार व पेशवे, होळकर, पटवर्धन, शिवाजी महाराज इ. बखरीही त्यांनी वाचल्या. याशिवाय कुमारसंभव, किरातार्जुनीय, मेघदूत या संस्कृत नाटकातील बरेचसे श्लोक त्यांनी तोंडपाठ केले होते. शाकुंतल, वेणीसंहार, मृच्छकटिक, मुद्राराक्षस इ. संस्कृत नाटकांचे वाचनही त्यांनी केले होते. इंग्रजीही त्या शिकत होत्या. गोविंदराव कानिटकर आणि काशीबाईंनी मिळून मनोरंजन आणि निबंधचंद्रिका नावाचे नियतकालिक सुरू केले. तेव्हा गोविंदरावांबरोबरच हरिभाऊ आपटे काशीबाईंना लेखनास उत्तेजन देत असत. या नियतकालिकात काशीबाईंचे लेखन सुरू झाले. शेवट तर गोड झाला (१८८९) हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रसिद्ध झाला. काशीबाईंना प्रथम लिहावेसे वाटले ते प्रार्थनासमाजातील सभांना त्या जात असत (इ.स. १८८१). त्यामुळेच आपले लिहिणे आणि आपले संसारातील जगणे यातील एका तणावपूर्ण गमतीदार नात्याचा शोध त्यांना लागला आणि त्या लिहू लागल्या.

## जीवन:

काशीबाईंचा जन्म वर्तमान महाराष्ट्रातल्या सांगली जिल्ह्यातील अष्टे गावी झाला. न्यायालयीन पेशात असलेल्या व स्वतः व्यासंगी लेखक असलेल्या गोविंद वासुदेव कानिटकरांसोबत वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. गोविंदरावांनी काशीबाईंना घरीच मराठी, संस्कृत, इंग्रजी भाषा शिकवल्या. काशीबाई बनारस हिंदू विश्वविद्यालयात मराठी भाषाविषय शिकवीत असत. पहिल्या भारतीय स्त्री डॉक्टर आनंदीबाई गोपाळराव जोशी यांच्या मृत्यूनंतर त्यांचे चरित्र काशीबाई कानिटकर यांनी लिहिले. काशीबाई इ.स. १९१० च्या भारतीय राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास हजर होत्या.

मनोरंजन,नवयुग आणि विविधज्ञानविस्तार आदि मासिकांमधून काशिबाईचे स्फुटलेखन प्रसिद्ध झाले आहे. रंगराव (१९०३) व पालखीचा गोंडा (१९२८) या कादंबऱ्या आणि शेवट तर गोड झाला (१९८९), चांदण्यातील गप्पा (१९२१), शिळोप्याच्या गोष्टी (१९२३) हे कथासंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. डॉ.आनंदीबाई जोशी :चरित्र व पत्रे या चरित्रात्मक पुस्तकाने साहित्यात त्यांना बरीच ख्याती मिळाली. हरीभाऊंची पत्रे हे त्यांचे पुस्तकही प्रसिद्ध आहे.१९८८ मध्ये गोविंदराव अलिबाग मुक्कामी मुन्सफ होते. तेव्हा तेथील वास्तव्यात काशीबाईंनी चांदण्यातील गप्पांतील कथांचे लेखन केले. या संग्रहात शिसवी पेटी, मारूतीचा प्रसाद, वनवास, सारसबाग, लावण्यवती अशा एकूण पाच कथा आहेत. ही कथामालिका १९०४ मध्ये मासिकातून प्रसिद्ध होत होती. साध्या, सरळ शैलीतील या कथा केवळ करमणुकप्रधान तर नाहीतच, पण विविध मानवी स्वभावाचे रेखाटन चांगले झाले आहे. या कथांमधील राजकन्या, चंपी अथवा मथुताई, स्वरुपसिंह यांच्या व्यक्तिरेखाटनातून काशीबाईंची सूक्ष्म अवलोकन शक्ती आणि साधी, सरळ वर्णनशैली जाणवते. शिळोप्याच्या गोष्टीतील कथांमध्येही काशीबाईंनी विविध स्वभावाच्या माणसांचे नमुने वर्णिले आहेत. केवळ करमणुसाठी,

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC

मनोरंजनासाठी अशी एकही कथा त्यांनी लिहिलेली नाही. त्यांच्या पहिल्या रंगराव या कादंबरीची पहिली ३६ प्रकरणे मनोरंजन  आणि निबंधचंद्रिका  या मासिकात प्रसिद्ध झाली. स्त्रीची सुखदु:ख, कर्तबगारी या साऱ्याचं चित्रण त्यांच्या रंगराव  या कादंबरीत रेखाटलं आहे. पती शिकायला वा नोकरीच्या निमित्ताने परगावी मग एकत्र कुटुंबात अल्पवयी मुलींना होणारा सासुरवास, अपत्यहीन स्त्रीला भोगावे लागलेले शाब्दीक चटके. पैसा नाही, आधार नाही अशा निराधार अवस्थेत, कुठेतरी अपार कष्ट आणि अवेहेलना सोशित राहणाऱ्या बालविधवा या साऱ्याचे चित्रण त्यांच्या इतर लेखनाप्रमाणेच पहिल्या रंगराव या कादंबरीत आले आहे. पालखीचा गोंडा (१९२८) या कादंबरीमध्ये  पात्र रेवतीचे लग्न एका वेडगळ संस्थानिकाशी होते. पण ती संस्थानाची सर्वांगीण प्रगती साधून अनेक सुधारणा घडवून आणते. अखेर राज्यकारभार प्रजेच्या हाती देऊन मन:शांतीसाठी यात्रेला निघून जाते. रेवतीच्या निमित्ताने त्यांनी स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या दु:खाची जाणीव वाचकांना करून दिली आहे.

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC

## कादंबरी:

- रंगराव
- पालखीचा गोंडा

## कथा संग्रह:

- शेवट तर गोड झाला
- चांदण्यातील गप्पा

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK
KNOWLEDGE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401